**Q.P. Code : 08641**

**वेळ:३ तास** **एकुण गुण:१००**

सूचना: १. **सर्व** प्रश्नांना **समान गुण** आहेत.
२. **सर्व प्रश्न** सोडविणे **आवश्यक** आहेत.

१. (अ) विशिष्ट लेखकाभ्यास करताना कोणकोणत्या गोष्टींचे अवधान राखावे लागते ते तपशील देऊन विशद करा. २०

**किंवा**

(ब) विशिष्ट लेखकाभ्यास ही संकल्पना स्पष्ट करून चरित्रात्मक अभ्यास पद्धतीचे विशेष व तिच्या मर्यादांचे सविस्तर विवेचन करा.

२. (अ) ''जयवंत दळवींची कथा सतत मानवी जीवनातील दुःखाचा शोध घेत असते.'' या विधानाचा वेचक जयवंत दळवी या कथासंग्रहाधारे सत्यता स्पष्ट करा. २०

**किंवा**

(ब) '' जयवंत दळवी यांच्या वाङ्मय शैलीचे कोणते विशेष 'वेचक जयवंत दळवी' या कथासंग्रहातून जाणवतात ते स्पष्ट करा.

३. (अ) तत्कालीन समाजवास्तवाचे व्यक्तीच्या मनावर होणारे परिणाम 'अंधाराच्या पारंब्या' या कादंबरीमध्ये कसे व्यक्त झाले आहेत ते स्पष्ट करा. २०

**किंवा**

(ब) 'अंधाराच्या पारंब्या' या कादंबरीच्या शीर्षकाची यथार्थता सोदाहरण स्पष्ट करा.

४. (अ) ''तऱ्हेवाईक माणसांच्या व्यक्तिचित्रणाचा एक प्रदीर्घ पट म्हणजे 'सारे प्रवासी घडीचे' ही साहित्यकृती होय.'' या विधानाचा सोदाहरण परामर्श घ्या. २०

**किंवा**

(ब) वर्तमानकाळाच्या पार्श्वभूमीवर हरवत चाललेले 'आजचेपण' व त्यातून आलेली उदासीनता 'सारे प्रवासी घडीचे' मध्ये कशी व्यक्त झाली आहे ते स्पष्ट करा.

५. (अ) ''वृद्ध माता-पित्यांच्या अपेक्षाभंगाचा नाटयत्मक आविष्कार म्हणजे 'संध्या छाया' हे नाटक होय.'' या विधानाची चर्चा करा. २०

**किंवा**

(ब) ''उच्चविद्याविभूषित परदेशस्थित तरुणपिढी व त्यांचे मातृभूमीमध्ये राहणारे वृद्ध माता-पिता यांच्यातील आंतरिक संघर्ष 'संध्या छाया' नाटक पाहताना रसिक-वाचकाना शोकमग्न करतो'' या विधानाचा परामर्श घ्या.

--------------------------